# आरोग्य सेवा संचालनालय

[महाराष्ट्र शासन]

: ११८ ६६ ०३
एचव्हएमएल आयाग्न

: २६२ १० ३१-३६
(वैयक्तिक) : २६२ १० ०६
( " ) (वैद्यकीय) : २६२ ११ ८६
( " ) (पीडीई) : २६२ ०९ २५
( " ) (सेवा) : २६२ ०८ ६५

शासकीय दंत महाविद्यालय इमारत
४ था मजला, सेंट जॉर्जेस रुग्णालय आवार
पी. डिमेलो रोड, मुंबई ४०० ००१
महाराष्ट्र राज्य (भारत).

तार : आरोग्य सेवा, मुंबई ४०० ००१

क्रमांक : संआसे/सेल/न.ग्रा. नोंदणी/क१८

दिनांक : ९ जुलै १९९२.

प्रति,
उपसंचालक आरोग्य सेवा
[आमाजीआ] पुणे.

विषय :- कुठल्याही नगरपालिका अथवा ग्रामपंचायतीच्या हद्दीत जो भाग समाविष्ठ नाही अशा विर्निदिष्ठ क्षेत्रामध्ये [Specified area] नोंदणीची व्यवस्था....

संदर्भ :- उपसंचालक आरोग्य सेवा [आमाजीआ] पुणे या कार्यालयाचे जा. क्र. आमाजीआ/कक्ष ८३/८८४९/८५१/९२ दि. २९ जून १९९२.

आपले संदर्भाधीन दिनांक २९ जून १९९२ चे पत्र कृपया पहावे. शहरालगतच्या परंतु कुठल्याही नगरपालिका, महानगरपालिका अथवा ग्रामपंचायत यांच्या कार्यक्षेत्रामध्ये काही भाग येत नाही अशा विर्निदिष्ठ क्षेत्रामध्ये (Specified Area) लोक वस्ती करुन राहतात. त्यांना नागरी सुविधा प्रमाणेच जन्म मृत्यू नोंदणी कार्यामध्ये अडथळे येतात. अलिकडे शहरालगत अशा झोपडपट्ट्या लोकसंख्या झपाट्याने वाढत असल्याने त्या भागातील लोकांची जन्म मृत्यू घटना नोंदणीबाबत जनतेची सोय करण्याची मागणी वाढत चाललेली आहे. या संबंधात जनतेचा जास्त वेळ जावू नये व लवकरात लवकर सोय व्हावी या दृष्टीने सदरचा भाग नोंदणी कार्यासाठी जवळच्या नगरपालिका, ग्रामपंचायत यांना जोडून तेथील निबंधकांकडून जन्म मृत्यूच्या घटना नोंदणी करण्याचे आदेश देण्याबाबतचे अधिकार उपसंचालक आरोग्य सेवा [आमाजीआ] व उपमुख्य निबंधक जन्म मृत्यू महाराष्ट्र राज्य, पुणे यांना याव्दारे प्रदान करण्यात येत आहे. तेंव्हा त्यांनी अशाप्रकारच्या प्रकरणा विषयी आपल्या स्तरावर योग्य ती कार्यवाही करुन प्रकरणे निकाली काढावीत.

संचालक आरोग्य सेवा
व
मुख्य निबंधक जन्म मृत्यू,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.